# महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई

# नागरिकाची सनद
# (**Citizen Charter**)

# <u>नागरिकाची सनद (**Citizen Charter**)</u>

<u>उद्देश –</u>

'न्याय सर्वांसाठी' हे विधी सेवा प्राधिकरणाचे घोषवाक्य आहे. भारतीय संविधानानुसार सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळण्याचे अधिकार प्राप्त होतात. राज्य घटनेच्या अनुच्छेद १४ नुसार सर्व नागरिकांना समान संधी दिलेली आहे. त्याचप्रमाणे अनुच्छेद ३९ नुसार समाजातील दुर्बल घटकांना मोफत कायदे विषयक सहाय्य देण्याची राज्य शासनाची जबाबदारी आहे. समान न्यायाची संधी म्हणजे न्यायालयीन प्रक्रीयेमध्ये सर्वांना सहभागाची समान संधी. जेणेकरुन समाजातील कोणतीही व्यक्ती किंवा घटक न्यायापासून वंचित राहू नये. परंतु, न्यायालयात न्याय मागण्याकरीता प्रथम आपल्या हक्काची जाणीव असणे व त्याबाबत उपलब्ध असणाऱ्या कायदयांची माहिती असणे आवश्यक आहे. तसेच न्यायालयात न्यायासाठी दाद मागण्याकरीता न्यायालयीन खर्च म्हणजेच कोर्ट फी, व इतर खर्च तसेच न्यायालयापुढे प्रकरणाची योग्य प्रकारे मांडणी करण्याकरीता तज्ञ वकील व त्याकरीता लागणारा खर्च या सर्वांची आवश्यकता असते.

विधी सहाय्य हे न्यायदान प्रक्रियेतील एक अविभाज्य अंग आहे. या महत्वाच्या घटकांचे उद्दीष्ट समाजातील दुर्बल व मागासवर्गीय घटकांना न्याय मिळवून देणे हे आहे. जोपर्यंत नागरिकांना शिक्षण व रोजगारासारखे मुलभूत अधिकार तसेच त्यांना सन्मानाने व स्वाभिमानाने जगण्याचा अधिकार प्राप्त करुन देता येत नाही, तोपर्यंत लोकशाहीस खरा अर्थ प्राप्त होत नाही. तमाम नागरिकांच्या विशेषत: दुर्बल व गोरगरिबांच्या हक्कांचे व हिताचे रक्षण व जोपासना करण्यासाठी राज्य विधी सेवा प्राधिकरणाची स्थापना झालेली आहे.

कोणताही कायदा, कल्याणकारी योजना इत्यादी बाबत जोपर्यंत लोकांमध्ये त्यांच्या हक्कासंबंधी व ते प्राप्त करण्यासाठी आवश्यक उपाय योजनाबद्दल अज्ञान असेल तोपर्यंत अशा कायदयाची व कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी योग्य रितीने होऊ शकत नाही. त्यासाठी संविधानाच्या कलम ३९ (अ) मधील निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य कायदेविषयक सहाय्य व सल्ला मंडळाची स्थापना करण्यात आली. सदरील मंडळाने मोफत कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना १९७९ ही अंमलात आणली. दरम्यान भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने 'Hussainara Kathoon V/s. Home Secretary State of Bihar, AIR 1979 SC 1369' या प्रकरणामध्ये भारत सरकारने गोरगरिबांना विधी सेवा उपलब्ध करुन देण्याची योजना तयार करावी असे निर्देश दिले. त्यानुसार माननीय न्यायमूर्ती श्री. पी.एन. भगवती यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली व त्या समितीच्या अहवालामध्ये राज्य कायदेविषयक सहाय्य व सल्ला योजना १९७९ चे अंतर्गत देण्यात येणारी

सहाय्य व सल्ला तसेच प्रलंबित खटल्याची संख्या कमी करण्यासाठी भरविण्यात येणा—या लोकन्यायालयांना वैधानिक मान्यतेची आवश्यकता आहे असे नमूद करण्यात आले. त्यानुसार विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ हा पारित करण्यात येऊन तो १९९४ पासून अंमलात आला. त्यानुसार राज्यातील दुर्बल घटक, मागासवर्गीय, स्त्रिया, मुले व इतरांना पुरविण्यात येणा—या विधी सेवा व लोकन्यायालयाचे आयोजन यास वैधानिक मान्यता देण्यात आली. त्यानुसार सर्व राज्यांमध्ये राज्य विधी सेवा प्राधिकरणाची कार्यालये अस्तित्वात आली.

- <u>विधी सेवा प्राधिकरणाचे कार्य —</u>

विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ च्या तरतुदीनुसार राष्ट्रीय पातळीपासून ते तालुका पातळीपर्यंत विधी सेवा प्राधिकरण व समितीची स्थापना करण्यात आली. संविधानाच्या निर्देशानुसार लाभधारकांना विविध कायदे, त्यांना घटनेद्वारे प्राप्त अधिकार व कर्तव्य यांची माहिती देण्यासाठी आणि त्यांच्या अधिकाराचे उल्लंघन होऊन त्यांच्यावर अन्याय झाल्यास न्याय कसा प्राप्त करावा यासंबंधी मार्गदर्शन करण्यासाठी कायदेविषयक शिबिरे, चर्चासत्रे, कार्यशाळा या माध्यमातून लोकांमध्ये कायदयासंबंधी जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच न्यायालयातील प्रलंबित खटल्यांची संख्या कमी करण्याच्या उद्‌देशाने लोकन्यायालयाचे आयोजन करणे, सामाजिक व आर्थिकदृष्टया दुर्लभ घटक व गोरगरिबांना मोफत विधी सेवा व सहाय्य पुरविणे हे प्रमुख उद्‌देश आहेत.

- <u>विधी सेवा प्राधिकरणाच्या कार्यालयाची रचना —</u>

विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ नुसार राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यालय हे राष्ट्रीय स्तरावर दिल्ली येथे कार्यरत असून सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती हे त्याचे प्रमुख आश्रयदाते व सर्वोच्च न्यायालयाचे वरिष्ठ न्यायमूर्ती हे कार्यकारी अध्यक्ष असतात. राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यालय हे राज्य स्तरावर कार्यरत असून राज्यातील उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती हे त्याचे प्रमुख आश्रयदाते व उच्च न्यायायालचे वरिष्ठ न्यायमूर्ती हे कार्यकारी अध्यक्ष असतात. तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यालय हे प्रत्येक जिल्हा स्तरावर कार्यरत असून त्या जिल्हा न्यायालयाचे प्रमुख जिल्हा न्यायाधीश हे त्यांचे अध्यक्ष व दिवाणी न्यायाधीश वरिष्ट स्तर या संवर्गातील अधिकारी सचिव असतात. तालुका पातळीवर तालुका विधी सेवा समितीची स्थापना करण्यात आली असून तेथे कार्यरत असणारे वरिष्ठ न्यायाधीश हे त्या समितीचा अध्यक्ष असतात.

जिल्हा व तालुका पातळीवरील कार्यालय हे राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यक्रम राबवितात. तसेच मुंबई येथे उच्च न्यायालय विधी सेवा समिती व

नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठ येथे उच्च न्यायालय विधी सेवा उपसमितीची स्थापना करण्यात आली आहे.

- **विधी सेवेस पात्र व्यक्ती –**

१) महिला व मुले ;
२) अनुसूचित जाती व जमातीचे सदस्य ;
३) ज्यांचे वार्षिक उत्पन्न रु.३,००,०००/– पेक्षा जास्त नाही अशा व्यक्ती ;
४) औदयोगिक कामगार ;
५) कारावास, कैद असेलल्या व्यक्ती ; (Custody)
६) विपत्ती, वांशिक हिंसाचार, जातीय हिंसाचार, नैसर्गिक आपत्ती : पूर, दुष्काळ, भूकंप किंवा औदयोगिक आपत्तींना बळी पडलेल्या व्यक्ती ;
७) विकलांगता अधिनियम १९९५ नुसार विकलांग व्यक्ती ;
८) मानवी अपव्यापाराचे बळी, तसेच भिक्षेकरी ;

- **विधी सेवेमध्ये कशाचा समावेश होतो –**

१) कायदेविषयक प्रकरणामध्ये तज्ञ व्यक्तीतर्फे मोफत सल्ला व मार्गदर्शन.
२) कायदेविषयक वाद तडजोडीने मिटविण्याबाबत प्रयत्न.
३) कायदेविषयक वाद तडजोडीने मिटत नसलेस न्यायालयात प्रकरण दाखल करणेसाठी संपूर्ण सहाय्य.
४) सरकारी खर्चाने वकीलांची नेमणूक केली जाते.
५) योग्य त्या प्रकरणामध्ये कोर्ट फीची रक्कम दिली जाते.
६) न्यायालयीन प्रकरणामधील टायपिंग, झेरॉक्स व इतर दस्तऐवज तयार करण्याचा खर्च दिला जातो.
७) साक्षीदारांचा समन्स पाठविण्याचा खर्च दिला जातो.
८) न्यायालयीन वादाच्या अनुषंगाने होणारा इतर खर्च दिला जातो.

- **कायदेविषयक सहाय्य देण्याची पध्दत –**

अर्जदाराने आपला अर्ज विहीत नमुन्यात किंवा अन्य प्रकारे तक्रारीबाबत परिस्थिती थोडक्यात नमूद करुन संबंधित विधी सेवा प्राधिकरणाकडे देणे आवश्यक आहे.

- <u>अर्ज निकालात काढणे –</u>

सदर अर्जदार हा कायदेविषयक सहाय्य मिळण्यास पात्र आहे किंवा नाही याचा निर्णय करण्याकरीता सचिव किंवा वकीलांच्या पॅनलवरील एखादा वकील या योजनेनुसार अर्जाची छाननी करेल व असा निर्णय घेण्यासाठी त्याला आवश्यक वाटत असेल अशी आणखी माहिती पुरविण्यासाठी तो अर्जदारास फर्मावू शकेल. तसेच, त्याला हया बाबींवर अर्जदाराशी व्यक्तिश: चर्चा करता येईल आणि तसे करताना अर्जदार हा समाजातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकापैकी आहे आणि कायदेविषयक सहाय्य मिळविण्याच्या बाबतीतदेखील त्याला मदत करणे आवश्यक आहे, ही वस्तुस्थिती लक्षात घेण्यात येईल.

अर्जाच्या बाबतीत शक्य तितक्या लवकर म्हणजे १५ दिवसाच्या आत कार्यवाही करण्यात येईल.

ज्या जिल्हयात किंवा तालुका क्षेत्रात वाद उद्भवला असेल त्या संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरण किंवा संबंधित तालुका विधी सेवा समितीकडे अर्ज करावा. अर्जासोबत पात्रता ग्रहण करीत असल्याबाबतचे शपथपत्र जोडणे आवश्यक आहे.

कायदेविषयक सहाय्य व सल्ला मिळविण्याकरीताचा अर्ज राज्यात कोठेही, महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा समित्या तसेच उच्च न्यायालय विधी सेवा समिती, मुंबई व उपसमिती, नागपूर व औरंगाबाद यांच्याकडे करु शकतात व त्यांच्याकडून संबंधित कार्यालयाला ते अर्ज पाठविले जातात.

अर्जासोबत अर्जदाराच्या वार्षिक उत्पन्ना बद्दलचे शपथपत्र जोडणे आवश्यक आहे.

- <u>विधी सहाय्य कोणत्या प्रकरणात देता येत नाही?</u>

१) बदनामी (Defamation)
२) दुर्भावमूलक अभियोग (Malicious Prosecution)
३) न्यायालयाचा अवमान (Contempt of Court)
४) खोटया साक्षीचा गुन्हा (Perjury)
५) निवडणूक संबंधी प्रकरणे (Proceedings relating to any election)
६) फक्त दंडाचीच शिक्षा दिली जाऊ शकत असेल अशा अपराधासंबंधीच्या कार्यवाहीत.

७) आर्थिक अपराध, सामाजिक गुन्हे व नागरी अधिकार अधिनियम, १९५५ आणि स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ यांसारख्या सामाजिक कायदयांविरुध्दचे अपराध यांच्या बाबतीतील कार्यवाही.

८) कायदेविषयक सहाय्य मागणारी व्यक्ति ही जेव्हा :—

(अ) केवळ एक प्रतिनिधी म्हणून किंवा तिच्या पदीय नात्याने कार्यवाहीशी संबंधित असेल तेव्हा, किंवा

(ब) जिचे किंवा ज्यांचे हितसंबंध तिच्या हितसंबंधासारखेच असतील व अशा व्यक्तीस किंवा अशा व्यक्तिपैकी कोणत्याही व्यक्तीस त्या कार्यवाहीत पुरेसे प्रतिनिधीत्व असेल अशा इतर एखादया व्यक्तीबरोबर किंवा अनेक व्यक्तीबरोबर त्या कार्यवाहीशी संयुक्तपणे संबंधित असेल तेव्हा किंवा

(क) एखादया कार्यवाहीमध्ये निव्वळ औपचारीक पक्षकार म्हणून असेल कार्यवाहीच्या, परिणामाशी तिचा फारसा संबंध नसेल आणि योग्य ते प्रतिनिधीत्व न मिळाल्यास तिच्या हितसंबंधाला बाधा येण्याची शक्यता नसेल तेव्हा.

- विधी सेवा प्राधिकरणातर्फे राबविण्यात येणारे उपक्रम :—

१) विधी साक्षरता शिबिरे भरविणे.
२) चर्चासत्रे आयोजित करणे.
३) कार्यशाळांचे आयोजन करणे.
४) लोकन्यायालय भरविणे.

विविध कल्याणकारी योजनांव्यतिरिक्त दररोज नव—नवीन कायदे अस्तित्वात येत असतात. उदा. राष्ट्रीय रोजगार हमी योजना (NREGA), पालक व ज्येष्ठ नागरिक निर्वाह व कल्याण अधिनियम २००७ (Parents and Senior Citizen Maintenance and Welfare Act, 2007), घरगुती हिंसाचार प्रतिबंध कायदा (Domestic Violence Prevention Act), गर्भधारणा पूर्व व प्रसूतीपूर्व निदान उपयोगी (चाचणी तंत्र) (लिंग निवड प्रतिबंधक) अधिनियम (PCPNDT Act) वगैरे कायदे समाजातील दुर्बल व पिडीत घटकांना महत्वाचे फायदे देणारे आहेत. परंतु, लोकांमध्ये कायदयाविषयी असलेले अज्ञान हे कायदयाचे व कल्याणकारी योजनांची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्यामध्ये मोठा अडथळा ठरले आहे. म्हणून जनतेस त्यांचे हक्कासंबंधीची जाणीव करुन देणे व त्यांना कायदेविषयक साक्षर करण्यासाठी शिबिरांचे आयोजन केले जाते.

शिबिरामध्ये न्यायिक अधिकारी (कार्यरत किंवा निवृत्त) वकील वर्ग, सामाजिक कार्यकर्ते, अशासकीय स्वयंसेवी संस्था (NGO), विधी शाखेचा अभ्यास

करणारे विदयार्थी, त्यांचे शिक्षक, लोक प्रतिनिधी वगैरेंचा समावेश केला जातो. तसेच शिबिरांमध्ये पोलीस व शासकीय अधिकाऱ्यांचा समावेश असतो.

कायदा साक्षरता शिबीरे ही प्रामुख्याने महाराष्ट्रातील ग्रामीण व दुर्गम, झोपडपट्‌टी, कामगार वसाहत, शैक्षणिक संस्था वगैरे ठिकाणी भरविण्यात येतात. त्यामध्ये स्थानिक भाषेत नव्या कायदयाची व योजनांची ओळख व माहिती ही चित्रफीती, पथनाटय वगैरेच्या माध्यमाद्वारे दिली जाते. तसेच नागरिकांच्या अधिकारांची व कर्तव्याची माहिती देऊन अन्याय निवारणाबाबत दाद मागण्यासाठी मार्गदर्शन केले जाते.

- लोकन्यायालय म्हणजे काय?

वाद उद्‌भवला तर तो शक्यतोवर सामंजस्याने सोडवावा ही आपली प्राचीन परंपरा. गावातील जुनी—जाणती माणसे एकत्र येत आणि कोणाही मध्ये उद्‌भवलेला कुठल्याही स्वरुपाचा वाद समजुतीने मिटवित. ज्यांच्यापुढे वाद नेला जाई ते त्या गावातील आदरणीय आणि नि:पक्षपाती लोक असत. यालाच 'गाव—पंचायत' असे म्हणत. सध्याचे 'लोकन्यायालय' म्हणजे या गाव पंचायतीचेच आधुनिक रुप. जेथे कायदा जाणणाऱ्या नि:पक्षपाती लोकांचे न्यायमंडळ त्यांच्यापुढे येणाऱ्या प्रकरणांमध्ये सामंजस्याने न्याय तडजोड घडवितात.

- लोकन्यायालये कोठे भरविली जातात?

लोकन्यायालये राज्यातील सर्व न्यायालयांमध्ये नियमितपणे भरविली जातात. प्रत्येक जिल्हयाच्या व तालुक्याच्या ठिकाणी दोन महिन्यातून किमान एकदा व आवश्यकता भासल्यास त्याहून अधिक वेळा योग्य त्या सूचना देऊन त्या—त्या न्यायालयामध्ये लोकन्यायालयाचे आयोजन केले जाते. जिल्हयाच्या ठिकाणी होणारी लोकन्यायालये जिल्हा न्यायालयात तर तालुक्याच्या ठिकाणी होणारी लोकन्यायालये तालुका न्यायालय परिसरात भरविली जातात. उच्च न्यायालयामध्ये मुंबई येथे तसेच नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठाचे ठिकाणी देखील लोकन्यायालये भरविली जातात.

विधी सेवा प्राधिकरण कायदा, १९८७ च्या कलम २२ब नुसार सार्वजनिक उपयोगिताबाबत स्थायी लोकअदालत मुंबई, नागपूर, औरंगाबाद व पुणे येथे सुरु करण्यात आले आहे.

* <u>लोकन्यायालयाचे आयोजन कोण करते?</u>

लोकन्यायालयाचे आयोजन विधी सेवा प्राधिकरणांमार्फत केले जाते. राज्य व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणे, तालुका विधी सेवा समित्या व उच्च न्यायालय विधी सेवा समिती याद्वारा विधी सेवा प्राधिकरण अधिनियम, १९८७ मधील तरतुदींतर्गत लोकन्यायालयांचे वेळोवेळी आयोजन केले जाते. लोक न्यायालयाची तारीख सामान्यत: एक महिना अगोदर जाहीर केली जाते.

* <u>लोकन्यायालयांची रचना कशी असते?</u>

लोकन्यायालय देखील एकाअर्थी न्यायालयच असते. उलटपक्षी न्यायालयात जेथे तुमच्या खटल्याच्या निवाडयासाठी एकच न्यायाधीश असतात तेथे लोकन्यायालयात किमान तीन जाणकार व्यक्तींचे पॅनेल न्यायाधीशांची भूमिका बजावते. कार्यरत अथवा निवृत्त ज्येष्ठ न्यायाधीश पॅनेलचे प्रमुख म्हणून तर अनुभवी वकील अथवा कायदयाच्या जाणकार व्यक्ती सदस्य म्हणून लोकन्यायालयाचे काम पहातात.

* <u>लोकन्यायालयापुढे कुठले खटले येतात?</u>

लोकन्यायालयामध्ये दिवाणी व फौजदारी दोन्ही स्वरुपाची प्रकरणे समेटासाठी येऊ शकतात. मोटार अपघात व भूसंपादन नुकसान भरपाईचे दावे, बॅंका व अन्य वित्तिय संस्थांचे वसुलीचे दावे, वैवाहिक संबंधातील वाद,चलनक्षम दस्तऐवजाचा कायदा १३८ (Negotiable Instrument Act 138) नुसार दाखल झालेली प्रकरणे वगैरेंसाठी स्वतंत्ररित्या खास लोकन्यायालये आयोजित केली जातात. वरील प्रकारात मोडणारी न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे तर लोकन्यायालयात घेता येतातच, शिवाय न्यायालयात दाखल न झालेली प्रकरणे देखील (Pre-Litigation) लोकन्यायालयापुढे समेटासाठी येऊ शकतात व त्याबाबत देखील लोकन्यायालयात निवाडा होऊ शकतो. म्हणजेच तुमचा वाद तुम्ही न्यायालयात प्रकरण दाखल करण्याअगोदर देखील लोकन्यायालयासमोर नेऊन त्याचा निवाडा करुन घेऊ शकता.

* <u>लोकन्यायालयासमोर दावा कसा येऊ शकेल?</u>

ज्या न्यायालयात आपला खटला प्रलंबित आहे तेथे एक अर्ज देऊन खटल्याच्या/दाव्याच्या कुठल्याही टप्प्यावर आपण आपला खटला

लोकन्यायालयापुढे नेऊ शकता. असा अर्ज आल्यावर न्यायाधीश दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतात व दाव्यातील वाद आपसात समजूतीने मिटू शकेल असे मत झाल्यास प्रकरण लोकन्यायालयापुढे ठेवण्याचा आदेश करतात. दावा व कैफियतीतील कथनांवरुन संबंधित न्यायाधीशांना प्रकरण आपसात समजुतीने मिटण्याची शक्यता वाटली तर कुठल्याही पक्षाचा अर्ज नसला तरी न्यायाधीश स्वत:हून खटला लोकन्यायालयाकडे वर्ग करु शकतात.

- लोकन्यायालयाचे कामकाज कसे चालते?

जाहीर झालेल्या तारखेस नेमलेल्या ठिकाणी लोकन्यायालयाचे पॅनेल कामकाजास सुरुवात करते. लोकन्यायालयात त्या दिवशी सुनावणीसाठी घ्यावयाच्या खटल्यांची यादी पूर्वीच जाहीर झालेली असते. त्यातील खटले अनुक्रमे लोकन्यायालयासमोर सुनावणीसाठी घेण्यात येतात. लोकन्यायालयामसमोर पक्षकार स्वत: अथवा वकीलांमार्फत त्यांची बाजू मांडू शकतात. आवश्यकता भासल्यास लोकन्यायालय आवश्यक ती माहिती संबंधितांकडून पुराव्याच्या स्वरुपात मागवू शकतात. खटल्यांची सर्व कागदपत्रे मूळ स्वरुपातच लोकन्यायालयापुढे असतात व पॅनेल सदस्य त्यांची योग्य ती दखल नेहमीच घेऊ शकतात. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकल्यावर पॅनेल सदस्य दोघांनाही समेटासाठी योग्य पर्याय देखील सुचवित असतात. पॅनेल सदस्य तटस्थपणे काम करीत असल्याने बहुतांश वेळा त्यांच्या सुचनांचा पक्षकारांकडून आदर केला जातो व त्यानुसार समेट घडून येतात. ज्या अटी व शर्तीवर आपसात समझोता होतो त्या अटी व शर्ती लगेचच लेखी स्वरुपात उतरविण्यात येतात व दोन्ही पक्षकार आणि त्यांचे वकील त्या खाली सहया करतात. तद्नंतर लोकन्यायालयाचे पॅनेल सदस्य देखील त्या खाली आपल्या सहया करतात. अशा प्रकारे लोकन्यायालयाचा निवाडा तयार होतो.

- लोकन्यायालयाच्या निवाडयाची अंमलबजावणी कशी होते?

लोकन्यायालयात होणारा निवाडा म्हणजे न्यायालयाचा पक्का हुकूमनामाच. लोकन्यायालयापुढे तडजोडीबाबत पक्षकार जी आपसात समजूत करतात किंवा आपसात समजूतीचा जो मसूदा तयार करतात त्याचेच रुपांतर लोकन्यायालयाच्या निवाडयात होते. न्यायालयाच्या हुकूमनाम्याची व्हावी तशीच अंमलबजावणी लोकन्यायालयात झालेल्या निवाडयाची करता येते आणि त्याहून महत्वाचे म्हणजे **लोकन्यायालयात होणारा निवाडा हा अंतिम असतो. त्या विरुध्द अपील करता येत नाही.** त्यामुळे तुमच्यातील भांडणाला/वादाला पूर्ण विराम मिळतो आणि दिर्घकाळ प्रलंबित कोर्टबाजीतून तत्क्षणी तुमची सुटका होते.

- <u>लोकन्यायालयात समेट झाला नाही तर काय?</u>

समजा काही कारणास्तव तुमचा वाद लोकन्यायालयात मिटू शकला नाही तर तुमचा दावा संबंधित न्यायालयाकडे परत जातो व प्रचलित न्याय पध्दतीप्रमाणे दाव्यासंदर्भातील दरम्यानचे काळात तात्पुरती थांबलेली कारवाई पुढे सुरु होते. दावा न्यायालयात दाखल करण्यापूर्वी लोकन्यायालयापुढे आणला असेल (Pre-Litigation) व त्याचा निवाडा होऊ शकला नाही तर न्यायालयीन खटला दाखल करण्याचा मार्ग मोकळा राहतो. लोकन्यायालयासमोर तुम्ही काही तडजोडीचा प्रस्ताव दिला असला तरी तो मूळ खटल्याच्या अभिलेख्यामध्ये कुठेही येत नाही व दाव्याच्या गुणवत्तेच्या आधारे निकाली होण्याच्या प्रक्रियेवर त्याचा काहीही अनुकूल अथवा प्रतिकूल परिणाम होत नाही.

**सारांश – लोकन्यायालयापुढे येण्यात नुकसान काहीच नाही झालाच तर त्याचा फायदाच होतो.**

- <u>लोकन्यायालयाबाबत माहिती कोठे मिळेल?</u>

उच्च न्यायालयात आयोजिल्या जाणा–या लोकन्यायालयाची माहिती मुंबई येथे उच्च न्यायालय विधी सेवा समिती, १०४ पी.डब्ल्यू.डी. बिल्डिंग, उच्च न्यायालय, फोर्ट, मुंबई–३२ येथे तर नागपूर आणि औरंगाबाद खंडपीठांसाठी त्या त्या ठिकाणच्या उच्च न्यायालय विधी सेवा उपसमितीकडे मिळेल. जिल्हा व तालुका न्यायालयांमध्ये होणा–या लोकन्यायालयांची माहिती त्या त्या जिल्हा व तालुका न्यायालयामध्ये कार्यरत असलेल्या जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व तालुका विधी सेवा समित्यांच्या कार्यालयांकडून मिळेल.

**‘‘लोकन्यायालयात वाद मिटे,<br>टिकून राही सन्मान,<br>वेळ–पैसा दोन्ही वाचे,<br>शिवाय मिळे समाधान’’**

- <u>लोकन्यायालयाचे फायदे</u>

१. खटल्याचा झटपट निकाल लागतो. तोंडी पुरावा–उलट तपासणी–दीर्घ युक्तिवाद या बाबी टाळल्या जातात.
२. लोकन्यायालयाच्या निवाडयाविरुध्द अपील नाही. एकाच निर्णयात कोर्टबाजीतून कायमची सुटका होते.

३. लोकन्यायालयात होणारा निवाडा हा आपसात समजूतीने होत असल्याने ना कोणाचा जय होतो ना कोणाची हार.
४. लोकन्यायालयाचा निवाडा दोन्ही पक्षांना समाधान देतो.
५. परस्पर संमतीने निकाल होत असल्याने एकमेकातील द्वेष वाढत नाही व कटूताही निर्माण होत नाही.
६. न्यायालयाच्या हुकूमनाम्याप्रमाणेच लोकन्यायालयात होणा—या निवाडयाची अंमलबजावणी न्यायालयामार्फत करता येते.
७. वेळ आणि पैसा दोघांचीही बचत होते.
८. लोकन्यायालयात निकाली निघणाऱ्या प्रकरणांमध्ये कायदयानुसार कोर्ट फी ची रक्कम परत मिळते.

- <u>प्राधिकरणाद्वारे नुकत्याच सुरु करण्यात आलेल्या 'न्याय आपल्या दारी' हा उपक्रम काय आहे?</u>

कोणताही कायदा, कल्याणकारी योजना इत्यादी बाबत लोकांमध्ये त्यांच्या न्याय हक्कांसंबंधी व ते प्राप्त करण्यासाठी आणि त्यावरील उपाय योजनांसंबंधी असलेले अज्ञान नेहमीच कायदयाची व कल्याणकारी योजनांची यशस्वीरित्या अंमलबजावणी करण्यामध्ये मोठा अडथळा ठरले आहे. म्हणून जनतेत हक्कासंबंधी जाणीव करुन देणे याकरीता विधी सेवा प्राधिकरणाने आपल्या प्रयत्नांचा वेग वाढविणे हे त्यांचे आदय कर्तव्यच आहे. त्यानुसार मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाचे कार्यकारी अध्यक्ष, माननीय न्यायमूर्ती यांच्या कल्पक व अमूल्य मार्गदर्शनानुसार महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाने गरीब व दुर्बल घटकांचे सबलीकरण व्हावे, ज्या योगे त्यांच्या कायदेशीर हक्कांद्वारे त्यांना पूर्ण फायदा मिळवता यावा याकरीता स्तुत्य उपक्रम सुरु केले आहेत.

निरक्षरतेमुळे आपल्या समाजातील बऱ्याच व्यक्तींना त्यांच्या हक्कांची व अधिकारांची माहिती नसते. अशा व्यक्तींना त्यांच्या हक्कांची जाणीव करुन देऊन ते प्राप्त करण्यासाठी उपलब्ध असणाऱ्या योजनांची माहिती त्यांच्या दाराशी जाऊन देण्याची व त्यांच्यापैकी गरजू व्यक्तींना मोफत विधी सेवा पुरवण्याची नितांत आवश्यकता आहे. 'विधी साक्षरता' आणि 'लोक अदालत' करीता फिरत्या वाहनाची संकल्पना, दुर्बल घटकांना तसेच गरीब व गरजू लोकांना त्यांना हवे असलेल्या विधी सहाय्याकरीता विधी सेवा प्राधिकरणाकडे जाणे अवघड ठरत असल्यास, विधी सेवा प्राधिकरणच त्यांच्या दाराशी जाईल, या गोष्टींची जाणीव ठेवूनच पुढे आली.

असे ही काही लोक आहेत, की जे जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी असलेल्या विधी सेवा केंद्राकडे सहाय्य मागणीकरीता जाण्यासाठी कचरतात. त्यामध्ये महिला, अनुसूचित जाती व जमातीतील लोक, मजूर, आर्थिक दृष्टया दुर्बल घटक इत्यादींचा देखील समावेश होतो. अशा लोकांना कायदयाची माहिती करुन देण्याकरीता व पक्षकारांतील वादाचे सलोख्याने व त्वरित निराकरण करण्यासाठी प्रशिक्षित व अनुभवी न्यायिक अधिकारी व सामाजिक कार्यकर्ते जे गावातील प्रत्येक कानाकोपऱ्यात विशेषत: दुर्गम, आदिवासी पाडा, ग्रामीण व आदिवासी भाग, खेडेगाव, झोपडपट्टी व औदयोगिक क्षेत्र वगैरे ठिकाणी जाऊ शकतील व यासाठी 'फिरते विधी सेवा आणि लोक अदालत योजना' सुरु करण्यात आली आहे.

फिरते वाहन पथकामध्ये न्यायिक अधिकारी (निवृत्त वा कार्यरत), वकील, सामाजिक कार्यकर्ते, अशासकीय स्वयंसेवी संस्था, विधी शाखेचा अभ्यास करणारे विदयार्थी, विधी महाविदयालयातील शिक्षक यांचा समावेश राहील. असे पथक निश्चित केलेल्या दिवशी किंवा अधून मधून संबंधित जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे तयार केलेल्या कार्यक्रम वेळापत्रकानुसार, ग्रामीण भागात, झोपडपट्टयांमध्ये, दुर्गम आदिवासी आणि खेडेगाव वगैरे ठिकाणी भेट देतात.

- <u>फिरत्या वाहनात उपलब्ध सुविधा</u>

सदरील वाहन, फिरते लोक अदालत आणि विधी जागृती वाहन म्हणून वापरण्यात येते, या वाहनामध्ये फिरते न्यायालय, लोक अदालत व विधी जागृती शिबिर वगैरे आयोजित करण्याकरीता आवश्यक त्या अंगभूत, मूलभूत सुविधा पुरविण्यात आल्या आहेत. त्या मूलभूत सुविधा खालीलप्रमाणे–

१) न्यायालय कक्ष व तीन पीठासीन अधिका–यांकरीता आरामदायक खुर्च्या व समोर ध्वनीयंत्रणा बसविलेले टेबल.

२) न्यायाधीशांकरीता व पथकातील व्यक्तींकरीता प्रवासासाठी वातानुकुलीत स्वतंत्र कक्ष व बाजूस घडी करता येणारा टेबल.

३) फायली ठेवण्याकरीता स्वतंत्र व्यवस्था.

४) वाहनाच्या पाठीमागे एक सरकते छत असलेले व्यासपीठ व घडी करुन ठेवता येणारे टेबल व खुर्च्या.

५) संगणक प्रिंटरसह.

६) लघुलेखक व संगणक चालकाकरीता आसनाची सुविधा व वकीलांकरीता आसन व्यवस्था.

७) डी.व्ही.डी. प्लेअर, कॅसेट प्लेअर सह टी.व्ही. झुलत्या ब्रॅकेटसह.

८) चित्रदर्शक (प्रोजेक्टर) सह पडदा लावलेला कक्ष.

९) अंतर्गत व बाहय सार्वजनिक ध्वनी यंत्रणा.
१०) होंडा कंपनीचे जनरेटर (जनित्र) संच.
११) हॅलोजन लाईट – प्रकाश योजनेकरीता.

- **लोकन्यायालयाव्यतिरिक्त प्रलंबित खटले कमी करण्यासाठी आणखी काही उपक्रम राबविले जातात का?**

दिवाणी प्रक्रिया संहितेच्या कलम ८९ चे तरतुदीनुसार प्रलंबित खटल्यांची संख्या कमी व्हावी व न्याय मिळणे सुकर व्हावे याकरीता उच्च न्यायालयातर्फे मुंबई व सर्व जिल्हा न्यायालयामध्ये मध्यस्थी केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे.

- **मध्यस्थी म्हणजे काय ?**

मध्यस्थी म्हणजे हस्तक्षेप प्रक्रियेचा एक भाग, ज्यात एक तटस्थ व्यक्ती म्हणजे मध्यस्थ, जो विवादक पक्षकारांमध्ये असणारा तंटा परस्पर संमतीने सोडविण्याकरीता मदत करतो. मध्यस्थी ही गोपनीय, ऐच्छिक व परस्पर सहभाग असणारी अशी प्रक्रिया असून नि:पक्षपाती आणि तटस्थ तिऱ्हाईत मध्यस्थीसमोर विवादकांना त्यांच्या परस्पर संमतीने त्यांची तक्रार व भावन मांडण्याची व व्यक्त करण्याची संधी मिळते. त्याद्वारे पक्षकारांना त्यांच्या असाध्य परिस्थितीवर, वादावर आणि मागण्यांवर तोडगा काढण्याची संधी प्राप्त होते. मध्यस्थ कोणताही तोडगा थोपवत नाही. ते पक्षकारांना त्यांच्यातील तंटा सामोपचाराने सोडवता यावा याकरीता अनुकूल परिस्थिती निर्माण करतात.

- **मध्यस्थी म्हणजे :**

१) संरचनात्मक, अनौपचारिक वाटाघाटी प्रक्रिया.
२) अशी प्रक्रिया ज्यात तटस्थ असा मध्यस्थ विशेष विशेषीकृत संवाद व चर्चा तंत्राचा वापर करतो.
३) विवादकांना त्यांच्यामधील तंटा मिटविण्याकरीता सहाय्य करणारी अशी ऐच्छिक, गोपनीय, पारदर्शी आणि लवचिक प्रक्रिया.

- **मध्यस्थीकरीता अर्ज कसा करता येईल ?**

दिवाणी प्रक्रिया संहीतेच्या कलम ८९ मध्ये स्पष्टपणे मांडले आहे की, एखाद्या प्रकरणात सामोपचाराने तंटा मिटविण्याचा जराही वाव असल्यास, पीठासीन अधिकारी सदर प्रकरण पर्यायी वाद निराकरणाकडे संदर्भित करु

शकतील. जेव्हा दोन्हीही पक्षकार समझोता करण्यास कबूल नसतील, परंतु त्यांची मध्यस्थीच्या माध्यमाने समेटाची शक्यता शोधण्याची प्रामाणिक इच्छा असल्यास, आणि जर पीठासीन अधिकाऱ्यास तसे करणे योग्य वाटल्यास, प्रकरण मध्यस्थीकरीता मध्यस्थी केंद्राकडे संदर्भित केले जाईल.

- **मध्यस्थी पध्दतीत काय केले जाते ?**

मध्यस्थीची प्रक्रिया अनौपचारिक पण संरचानात्मक प्रक्रिया आहे, ज्यात अनेक टप्प्यांचा समावेश होतो. त्यापैकी टप्पे खालीलप्रमाणे :—

१. **ओळख** — मध्यस्थी तीची/त्याची ओळख पक्षकारांना करुन देते/देतो व मध्यस्थी प्रक्रियेची माहिती समजावून सांगतो. तसेच, तटस्थता आणि गुप्ततेची खात्री देतो. तो (मध्यस्थ) मूळ (सर्वसाधारण) नियम समजावून सांगतो आणि शेवटी समेटाकरीता मुक्त वातावरणातील चर्चेकरीता चालना देतो.
२. **संयुक्त बैठक** — मध्यस्थ वादाच्या खऱ्या पार्श्वभूमीची व पक्षकारांच्या हितासंबंधीची माहिती गोळा करतो. पक्षकारांमधील संवाद प्रस्थापित करतो आणि त्यांच्यामधील वाद संदर्भात सामोपचाराने समेट घडून यावे याकरीता अनुकूल वातावरण निर्माण करतो.
३. **वैयक्तिक (विलग) बैठक** — यांत मध्यस्थी पक्षकारांना त्यांच्या तक्रारी, मागण्या, अपेक्षा विस्तृतपणे सांगण्यास मुभा देतो आणि पक्षकारांना गोपनीय माहिती प्रकट करण्यासाठी त्यांचे मन वळवीत असतांनाच, पुढे आणखी माहिती गोळा करण्याचे कार्य चालू ठेवतो, आणि पक्षकारांद्वारा किंवा मध्यस्थीद्वारा सामोपचाराने समेट घडण्यासाठी शोधून काढलेल्या पर्यायांची निवड करण्यास मदत करतो.
४. **करार (संमत)** — मध्यस्थ समेटाच्या अटींवर शिक्कामोर्तब करुन त्यांची स्पष्टता व्यक्त करतो आणि पक्षकारांना स्वीकार्य असेल त्याप्रमाणे समेटाच्या अटींची स्पष्टपणे, मुद्देसूद आणि ठोसपणे नोंद करतो.

- **मध्यस्थी पध्दतीचे फायदे**

१) न्यायालयीन खटल्यांमधील निकालांपेक्षा, मानसिक दृष्टया आणि दृढतेच्या दृष्टीने अधिक समाधानकारक निकाल.
२) मतैक्य आणि मतभिन्नतेचे मुद्दे शोधून, विवाद्य मुद्यांतील दरी कमी करणे.
३) याद्वारे कोणत्याही विवादातील पक्षकारांना त्यांची मते, दृष्टीकोन प्रत्यक्षपणे, अनौपचारिकपणे, गोपनीयतेने आणि सूडाच्या भितीशिवाय मांडता येतात. तसेच, मध्यस्थी प्रक्रिये दरम्यान केलेले निवेदन, समझोता न झाल्यामुळे

पक्षकाराविरुध्द पुढे कोणत्याही न्यायालयात वापरता येत नसल्यामुळे, त्यात मनमोकळेपणा असतो, जी गोष्ट उत्साहवर्धक आहे.

४) यामुळे वेळ, पैसा आणि शक्तीची बचत होण्यास मदत होते. कारण मध्यस्थी माध्यमांद्वारा वादाचे निराकरण, खटल्या अगोदर किंवा खटल्या दरम्यान किंवा अपिलातील न्यायनिर्णया अगोदर कोणत्याही वेळी करता येते.

५) न्यायालयीन खटल्यांच्या भितीचे निवारण.

६) तणावातून मुक्तता आणि मानसिक शांतीची पुन:प्राप्ती.

७) यामुळे दोन्ही पक्षकारांमधील वैरभाव कमी होतो आणि ज्यामुळे त्यांना त्यांचा व्यवसाय/धंदा व वैयक्तिक संबंध पुन:प्रस्थापित होण्यास व टिकवून ठेवण्यास संधी प्राप्त होते.

८) ज्यामुळे दोन्ही विवादकांमध्ये विजयी झाल्याची परिस्थिती निर्माण होते.

सदस्य सचिव
महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण,
मुंबई